भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४४१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/०६/२०१७

**१) संगनमत करुन येण्या जाण्याच्या रस्त्याच्या कारणावरुन वाद चालु असुन वाईट वाईट शिवीगाळ व लांबाझोबी केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०९/०६/२०१७ चे ०७.३० ते ०८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी जगदीश बळीराम भांडारकर वय ४१ वर्ष, रा. मोहगाव देवी व आरोपी क्र. १ ते ४ यांचे घरा जवळ असुन ते वेगवेगळया समाजाचे आहेत फिर्यादी व आरोपी यांच्यात फिर्यादीने घेतलेल्या घराचे येण्या जाण्याच्या रस्त्यावर आरोपी यांनी केलेल्या अतीक्रमन बाबत वाद चालु असुन फिर्यादी हा बैलबंडी रस्त्यावरुन घराकडे नेत असतांनी आरोपीतांनी त्यास अडवुन वाईट वाईट शिवीगाळ करुन लांबाझोबी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. वरठी येथे कलम ३४१,३५२,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खोकले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**२) बोलेरो गाडी चालकांच्या निष्काळजीपणामुळे गाडीवरचा ताबा सुटल्याने बोलेरो गाडी पलटी होवुन स्वत: गंभिर जखमी होवुन उपचारा दरम्यान मरण पावल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १७/०५/२०१७ चे १२.३० वा. दरम्यान यातील मृतक आरोपीने आपले ताब्यातील बोलेरो गाडी क्र. एमपी २७ वाय ६३८० ने ढोलसर रस्त्याने आसगाव कडे येत असता आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवित येत असतांनी गाडीवरचा ताबा सुटल्याने बोलेरो गाडी ही पलटी होवुन त्यात आरोपी हा स्वत: गंभिर जखमी होवुन त्यास उपचारा करीता आशा हॉस्पीटल कामठी नागपुर येथे भरती केले असता औषधोपचार दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे नवी कामठी जि. नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौचे कागदपत्र पा. स्टे. ला टपालाने प्राप्त झाल्याने व मर्ग चे चौकशी वरुन सरतर्फे फिर्यादी सफौ. बावणे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. सहकलम १८५ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. चौधरी पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरुन लाथा बुक्यांनी नाकावर व पाठीवर मारपीट करुन नाकाला फॅक्चर केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०७/०६/२०१७ ते ०६.०० वा. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादी पत्नीला तु मला भाजी बद्दल का विचारले या वरुन आरोपीने फिर्यादीचे अंगावर धावुन आला व फिर्यादीला खाली पाडुन लाथा बुक्यांनी नाकावर व पाठीवर मारपीट करुन नाकाला फॅक्चर केल्याने फिर्यादी सौ. बाली कृष्णा बारस्कर वय २४ वर्ष, यांचे तोंडी रिपोर्ट व डॉक्टरी वरुन पोस्टे अडयाळ येथे कलम ३२५ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**४) मोटार सायकल चालकांने मागेहुन मोटार सायकला धडक देवुन दोघांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०४/०६/२०१७ चे १६.०० ते १६.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी श्रीमती सुनीता रामेश्वर गिरउकर वय ५४ वर्ष, रा. वार्ड क्र. ०४ मौदा जि. नागपुर ही मुलगा स्वपनील रामेश्वर गिरडकर वय २० वर्ष, याचे मोटार सायकल क्र. एमएच ४० बिबी ०४३५ युनिकॉन मोटार सायकलने जात असता आंबाळी जवळ नरेन्द्र कंपनी जवळ मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल हयगयीन, लापरवाहीने चालवुन मागेहुन धडक दिल्याने फिर्यादी व मुलगा खाली पडुन त्यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादींचे लेखी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १३४/१८७,१८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**५) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ०८/०६/२०१७ चे १६.०० ते १८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी सुनिल सुधाकर मेहर वय ४६ वर्ष, रा. शास्त्री वार्ड गणेशपुर भंडारा यानने आपली हिरो होंडा स्पेंन्डर कंपनीची मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ /४२२५ किंमती २०,०००/–रु. ची आपले घरा समोरील शेडचे कडेला हॅन्डल लॉक करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ३७९ भांदवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गायकवाड पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०९/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १६२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी १२ तीन सिटर वाहनांवरती १७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १३३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस नियंत्रण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.९४२३११५१८२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.